# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) या तालुक्यातील तालुकास्तरीय शासकीय कार्यालये एकाच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत आणण्याबाबत**

**(१) ४३९३ (२२-१२-२०१४) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) या तालुक्यातील तालुकास्तरीय शासकीय कार्यालये एकाच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत आणण्याबाबत दिनांक २३ फेब्रुवारी, २०११, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३ व दिनांक ११ जानेवारी, २०१४ रोजी मा.मुख्य मंत्री व मा.महसूल मंत्री महोदयांकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०३-२०१९) :** (१), (२), व (३) दि.२३/२/२०११ व दि.१४/११/२०१३ रोजी भोर तालुक्यातील तालुकास्तरीय शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय मध्यवती इमारतीत आणण्याबाबत निवेदन प्राप्त झाली आहेत.

भोर शहरातील ८६३२.०० चौ.मी. जागा भोर नगरपालिकेच्या मालकीची असून त्यावर प्रशासकीय इमारतीचे आरक्षण आहे. ही जागा महसूल विभागाच्या ताब्यात आल्यानंतर प्रशासकीय इमारतीचे अंदाजपत्रक सादर करता येऊ शकेल. तसेच या जागेच्या आसपासची जागा खाजगी व्यक्तींचे आहे, त्यांचेही भूसंपादन करावे लागेल.

वेल्हे येथील तहसिल कार्यालयाची नवीन प्रशासकीय इमारत बांधुन पुर्ण झाली असून दि.१६/७/२०१६ पासून याच इमारतीमधून तहसिल कार्यालयाचे कामकाज चालू आहे.

पौंड या मुळशी तालुक्याच्या मुख्यालयी ४३१२.९० चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम करण्याचे अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात येत असून सदर अंदाजपत्रक शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यास निधी उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे संकल्पित आहे.

---

**चेंबूर (मुंबई) येथील छेडानगर वसाहतीच्या पुनर्विकासासाठी जमीन मालकीचा वाद असल्याबाबत**

**(२) ६८०९ (०६-०४-२०१५). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील छेडानगर वसाहतीच्या पुनर्विकासासाठी जमीन मालकीचा वाद असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीचा पुनर्विकास व्हावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०३-२०१९) :** (१) व (२) मौजे चेंबूर (मुंबई) येथील छेडानगर वसाहतीच्या जमिनीच्या मालकी हक्काबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दावा क्र.१५६२/१९७८ अन्वये चालू होता, परंतू तो आता नगर दिवाणी न्यायालयाकडे वर्ग करण्यात आला असून मा. नगर दिवाणी न्यायालयामध्ये दावा प्रलंबित आहे.

विभागीय आयुक्त, कोकण यांनी मिठागराच्या जमिनी संदर्भात दाखल अर्धन्यायीक प्रकरणामध्ये दि. २७/०५/२०१५ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशान्वये मौजे चेंबुर येथील स.नं. ३२० पै या मिळकतीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २० (२) अन्वये नव्याने चौकशी करून मालकी ठरविण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सदर जमिनीच्या बाबतीत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २०(२) खालील चौकशी पुर्ण केली असुन प्रकरण आदेशाकरीता बंद केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धरमतर खाडी किना-यावरील मच्छिमार सहकारी संस्था व मच्छीमार कुटुंबियांना नुकसान भरपाई देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३) १५४९९ (८-३-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरमतर खाडी किना-यावरील जेएसडब्ल्यू इस्पात आणि पीएनपी कंपनी या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या मच्छिमार सहकारी संस्था व मच्छीमार कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळावी आणि त्यांने पुनर्वसन व्हावे, यासंदर्भात दिनांक ३१ जानेवारी, २०१५ पर्यंत निर्णय घ्यावा अन्यथा दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५ रोजीपासून बोट रोको आणि ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा प्रकल्पग्रस्तांनी जिल्हाधिकारी यांना दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०१-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) धरमतर खाडीतील मच्छिमारांच्या समस्या तसेच सागरी किनारपट्टीवरील प्रदुषणामुळे मत्स्योत्पादनावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी शासन निर्णय क्र. मत्स्यवि-१११३/प्र.क्र.३०७/पदुम १४, दिनांक २७.१२.२०१८ अन्वये समिती गठित करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रतिकूल हवामानामुळे कृषी उत्पादन घटत असल्याबाबत

**(४) ३९७१३ (२८-४-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर) आणि केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था (क्रिडा) यांनी केलेल्या मॅपिंगमधून प्रतिकूल हवामानाचा पिकांवर परिणाम होत असून महाराष्ट्रातील सोलापूर, बीड, अहमदनगर, उस्मानाबाद, लातूर, नंदूरबार, सांगली, बुलढाणा, धुळे, नाशिक, जालना, अमरावती हे १२ जिल्हे प्रभावित झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रतिकूल हवामानाचा परिणाम पिकांवर होत असून कृषी उत्पादन घटत असल्याने चारा टंचाई तसेच गुरांची पैदास कमी होत असून, दूध उत्पादनात घट होत असल्याचे मा.केंद्रीय कृषी राज्य मंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिलेल्या माहितीमध्ये नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हवामान बदलामुळे पिकांवर परिणाम होत असून त्यावर उपाययोजना म्हणून राष्ट्रीय शाश्वत शेती मोहीम राबविली जात असून, पर्जन्याधारित क्षेत्र विकास पाणी व्यवस्थापन, आरोग्य व्यवस्थापन, हवामान बदल आणि शाश्वत शेती मॉडेल व नेटवर्किंग या चार मुख्य घटकांच्या माध्यमातून अन्न सुरक्षा, अन्न स्त्रोतांचा समान वापर, उदरनिर्वाहाच्या संधी वाढविणे आदि उपाययोजना केंद्र शासनाकडून केल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रतिकूल हवामानाचा पिकांवर परिणाम होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) प्रतिकूल हवामानाचा पिकांवर परिणाम होत असल्याचे चारही कृषि विद्यापीठांच्या संशोधकांची निरीक्षणे आहेत.

सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यास, उत्पादित होणाऱ्या चाऱ्याच्या प्रमाणात निश्चितपणे घट होते. जिल्ह्यातील चाराटंचाईची तीव्रता कमी करण्याकरीता पशुधन छावण्या सुरु करण्यात आल्या होत्या.

माहे मार्च-२०१६ अखेर, मार्च-२०१५ च्या तुलनेत राज्यात कृत्रिम रेतन कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

राज्यात सप्टेंबर-२०१५ ते जानेवारी-२०१६ या कालावधीत दुधाच्या उत्पादनात घट झाल्याचे दिसून आलेले नाही.

(३) व (४) पर्जन्याधारित क्षेत्र विकास पाणी व्यवस्थापन ही योजना सन २०११ ते मार्च, २०१६ पर्यंत केंद्र शासनामार्फत कार्यान्वित होती. तसेच, शाश्वत शेती मॉडेल ही योजना भारतीय कृषी अनुसंधान परिषदेमार्फत राबविली जात आहे.

प्रतिकूल हवामानामध्ये पिकांवर परिणाम होऊ नये यासाठी केंद्र शासनाने शाश्वत कृषि उत्पादकतेसाठी सन २०१४-१५ पासून हवामान बदलाशी सुसंगत कृषि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान कार्यान्वित केले आहे. राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास ही योजना राज्यात सन २०१४-१५ पासून राबविली जात असून, या योजनेअंतर्गत एकात्मिक शेती पध्दतीद्वारे शेतकऱ्यांना दुग्धोत्पादन, इतर पशुधन व फलोत्पादन इ. राबविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांव्यतिरिक्त इतर उदरनिर्वाहाच्या संधी निर्माण होत आहेत. सदर योजना राबविल्यामुळे प्रतिकूल हवामानाचा शेतकऱ्यांच्या उत्पन्न व राहणीमानावर होणारा विपरीत परिणाम कमी करुन इतर उपजिविकेच्या संधी निर्माण झाल्याने आत्मविश्वास वाढविला जातो. तसेच राज्यातील चारही कृषी विद्यापीठांनी त्यांच्या संशोधन कार्यात या बाबींचा अंतर्भाव केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुर शहरातील व्यापारी व रहिवासी यांचेवर शासनाने लादलेला रुपांतरण कर रद्द करण्याबाबत**

**(५) ४१००२ (१७-५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील २६ हजार व्यापारी व रहिवासी नागरिकांवर रुपांतरण कर वसुलीच्या नोटीस बजाविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने समिती नेमली होती व समितीने अहवाल सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुपांतरण कर रद्द होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) याबाबत शासनाने कोणतीही समिती गठित केलेली नाही. तसेच, रुपांतरण कर हा शासनाचा महसूली कर असल्याने तो रद्द केल्यास शासनाच्या महसूलाचे नुकसान होईल. यास्तव, रुपांतरण कर रद्द करण्याची बाब सध्या शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर शहरातील (जि.नांदेड) मुख्य रस्त्याच्या दुतर्फा नाली व फुटपाथ बांधण्याबाबत**

**(६) ५०७९८ (०९-०५-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) शहरातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा नाली व फुटपाथ बांधकामासाठी सुमारे दोन कोटी रुपयाचा निधी आमदार निधीतून देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोकर शहरातील नाली, फुटपाथ बांधकामासाठी निधी वितरीत करुन सदरील कामे रेंगाळल्याने अर्धवट अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०४-२०१९) :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन कामास आमदार निधीतून निधी देण्यात आला असून योजनांतर्गत अर्थसंकल्पातून देण्यात आला आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

भोकर शहरांतर्गत केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर असून त्याचे प्रगतीनुसार रस्त्याचे दुतर्फा नाली व फुटपाथ बांधणे आवश्यक असल्याने काम पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. सदर काम प्रगतीपथावर असून निधीचा उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**मुंबईतील रेल्वे प्रवाशांना भेडसावणाऱ्या समस्यांसंदर्भात**
**रेल्वे मंत्र्याकडे पाठपुरावा करण्याबाबत**

**(७) ५०८९७ (१६-०६-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रचंड गर्दीची लोकल रेल्वे प्रवासी वाहतुक, गाडयांचे प्रभावी नियमन, संचालन व व्यवस्थापन यासाठी स्वतंत्र रेल्वे प्राधिकरण/मंडळ गठीत करण्यास राज्य शासनातर्फे पुढाकार घेऊन केंद्रीय रेल्वे मंत्र्याकडे पाठपुरावा केला जावा, अशा स्वरुपाची मागणी मुंबईतील प्रवासी संघटना, जागरुक नागरीक, विविध सामाजिक, राजकीय संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच श्री.भावेश नकाते या तरुणाचा लोकलच्या दरवाजामधील प्रचंड गर्दीमुळे पडून माहे नोव्हेंबर, २०१५ वा त्यादरम्यान मृत्यू झाला असून लोकल गाडयामध्ये प्रवाशांचे गट दरवाज्यात उभे राहून इतर प्रवाशांना गाडीत चढू देत नाहीत व यावरुन भांडणे होवून दरवाजामधील प्रचंड गर्दीमुळे पडून अनेक प्रवाशांचे मृत्यु होत असल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील लोकल रेल्वे गाडयातील प्रवाशांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्ये संदर्भात शासनामार्फत पुढाकार घेऊन रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०३-२०१९) :** (१) व (२) मुंबईतील उपनगरीय रेल्वे सेवेवर प्रवाशांचा ताण असल्याने राज्य शासनाने विविध मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचप्रमाणे काही नवीन उपनगरीय रेल्वे मार्ग सुरु करण्यासाठी राज्य शासनाने काही प्रमाणात आर्थिक सहभाग देण्याचेही मान्य केलेले आहे. मुंबईतील रेल्वे प्रकल्प राबविण्यासाठी मुंबई रेल्वे विकास महामंडळ कार्यरत आहे.
(३) मुंबईतील तसेच राज्यातील इतर रेल्वे प्रकल्पास गती देण्यासाठी वेळोवेळी रेल्वे मंत्रालयासोबत बैठका घेवून पाठपुरावा करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाने भाड्याने घेतलेल्या बसेसवर करण्यात आलेली कारवाई**

**(८) ५३६०९ (९-६-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवनेरी या एस.टी. महामंडळाच्या सेवेतील बसकडे पुरेशी कागदपत्रे नसताना, धावणाऱ्या आणि कर चुकवेगिरी करणाऱ्या चार खाजगी बसगाड्यावर परिवहन अधिकाऱ्यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी जप्तीची कारवाई केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित बसच्या मालकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०३-२०१९) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) येथील वायुवेग पथकाने दि.१०.०२.२०१६ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने भाड्याने घेतलेल्या १२ शिवनेरी गाडयांची तपासणी केली असता, त्यातील ८ गाडयांची योग्यता प्रमाणपत्राची वैधता संपल्याचे व कराचा भरणा केला नसल्याचे आढळून आले. त्यानुसार ८ गाडयापैकी ७ गाडयांना तपासणी प्रतिवेदन देण्यात आले असून, एक गाडी अटकावून ठेवण्यात आलेली आहे. या गाडयांपैकी २ गाडयांच्या चालक / मालकांकडून कर व दंड वसूल करण्यात आलेला आहे.

तसेच ६ गाडयांकडून प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांनी कर वसूल केला असुन, त्या गाडयांची योग्यता प्रमाणपत्रे विधिग्राह्य असल्याचे स्पष्ट झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खेर्डी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावाची पूररेषा निश्चित करून सिमांकन करण्याबाबत**

**(९) ७४९१५ (१३-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खेर्डी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावाला सन २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व महापुराचा तडाखा बसून मोठया प्रमाणात वित्तहानी झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेनंतर खेर्डी गावची पूररेषा निश्चित करून सिमांकन करण्याचे ठरले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही पूररेषा निश्चित करून सिमांकन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) रत्नागिरी जिल्ह्यातील वाशिष्ठी नदीचे पूर प्रवण क्षेत्र निश्चित करुन त्या ठिकाणी लाल रेषा व निळी रेषा आखण्याचे काम कार्यकारी अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे विभाग, कुवारबाग यांच्यास्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहकारी गृहनिर्माण संस्थांना अनेक वर्षापूर्वी भाडेपटटयाने (लिज) दिलेल्या वर्ग २ मधील जमिनी वर्ग १ मध्ये रुपांतरित करण्याबाबत**

**(१०) ८६३६४ (०१-०९-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सहकारी गृहनिर्माण संस्थांना अनेक वर्षापूर्वी भाडेपट्टयाने (लीज) दिलेल्या वर्ग २ जमीनी वर्ग १ मध्ये रुपांतरीत करण्याकरीता अधिनियम मंजूर करुन नियमावली तयार करण्यासाठी, दिड वर्षापूर्वी प्रधान सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अद्याप शासनास अहवाल सादर केला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिनियमांतर्गत नियमावली अस्तित्वात येवू न शकल्याने पुनर्विकासासाठी रेडीरेकनरच्या २५% प्रिमिअम आकारणे हे आर्थिकदृष्टया व्यवहार्य नसल्याने विकासक पुढे येत नसून यामुळे राज्यातील २० हजाराहून अधिक तर, मुंबईतील ३ हजार इमारतींचे पुनर्विकास प्रकल्प अनेक वर्षापासुन प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी समितीने शासनास अहवाल सादर करण्यास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व किती निश्चित कालावधीत अहवाल सादर होणे अपेक्षित आहे,
(४) तसेच, याबाबत शासनास अहवाल सादर झाला असल्यास त्या अनुषंगाने नियमावली तयार करुन त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) प्रदान केलेल्या शासकीय जमिनीचा धारणाधिकार रुपांतरीत करण्याच्या दृष्टीने राज्यमंत्रीमंडळाने दिनांक १७.०२.२०१६ रोजीच्या बैठकीत प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सदर समितीने शासकीय जमिनीचा धारणाधिकार रुपांतरीत करण्याच्या दृष्टीने सखोल अभ्यास करुन दिनांक २०.०४.२०१८ रोजी आपला शासनास अहवाल सदर केला. समितीचा अहवाल दिनांक २५.०९.२०१८ च्या मंत्रीमंडळ बैठकीत काही सुधारणेसह मान्य करण्यात आला. त्या अनुषंगाने केलेल्या नियमांचा मसुदा दिनांक १७.११.२०१८ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला. त्यासंदर्भात हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन त्यासंदर्भात शासन मान्यतेने अंतीम अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) लागू नाही.

---

**राज्यातील शेतजमिनी बिगरशेतीत रुपांतर होण्याचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(११) ८७७६९ (१९-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दरवर्षी ५६ हेक्टर शेतजमिनीचे बिगरशेतीत (एन.ए.) रुपांतर होत असून वहितीखालील जमिनी बिगरशेती होण्याचे प्रमाण वाढले असल्याचे कृषी गणनेत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शेतजमिनीचे बिगरशेतीत रुपांतर होण्याचे प्रमाण कोणत्या विभागात व जिल्हयात जास्त आहे,
(३) असल्यास, यामुळे राज्याचे कृषि उत्पादन कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून भविष्यात धान्योत्पादन योग्य प्रमाणात ठेण्यासाठी वहितीखालील जमिनीचे बिगरशेतीत रुपांतर होण्याच्या परवानगी न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

दर पाच वर्षांनी केल्या जाणाऱ्या कृषि गणनेंतर्गत वहीती खातेदार संख्या व वहिती क्षेत्र याबाबतची आकडेवारी संकलित करण्यात येते. कृषि गणना २०१०-११ नुसार राज्याचे वहिती क्षेत्र १९७.६७ लाख हेक्टर होते. कृषि गणना २०१५-१६ अनुसार राज्यात वहिती क्षेत्र २०५.०६ लाख हेक्टर असून, कृषि गणना २०१०-११ च्या तुलनेत वहिती क्षेत्रामध्ये ३.७४ टक्के वाढ झालेली आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील अंबड एमआयडीसीच्या खाणीत घातक रसायन टाकले जात असलेबाबत**

**(१२) ८९३६८ (१८-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक अंबड औद्योगिक वसाहतीतील खाण क्र.१४ येथे विषारी ॲसिडयुक्त रसायन टाकले जात असल्याची बाब दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या रसायनामुळे परिसरातील शेती व जवळच असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे जीवास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेची चौकशी झाली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०३-२०१९) :** (१), (२), (३) व (४) दि.१५/६/२०१७ रोजी एका ट्रकमधून केमिकलमिश्रीत माती मौजे विल्होळी, ता.जि.नाशिक येथील सर्वे नं.१४ या सरकारी जागेतील जुन्या बंद असलेल्या दगडखाणीत टाकत असल्याचे निदर्शनास आल्याने नाशिक तालुका पोलीस ठाणे येथे सदर ट्रकच्या चालकाविरुध्द दि.१५/६/२०१७ रोजी गु.र.नों.क्र.७/२०१७ दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर वाहन ताब्यात घेतले आहे.

सदर रसायनामुळे परिसरातील शेती व शाळेतील विद्यार्थ्यांच्या जीवास धोका निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण विभाग, मुंबई यांनी जमिन मोजणी प्रकरणातील अहवाल सादर करण्यास लावलेल्या विलंबाबाबत**

**(१३) ९५३५५ (२१-१२-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी**

**(दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील एका जमिन मोजणी प्रकरणात पोलीसांनी उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण विभाग, मुंबई यांच्याकडे अहवाल मागविण्यात आला होता असून सात महिण्याचा कालावधी झाल्यानंतरही सदर अहवाल उपसंचालक, भूमी अभिलेख, यांनी सादर केला नसल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त अहवाल तातडीने सादर करण्याबाबत तसेच अहवाल सादर करण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०३-२०१९) :** (१) रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे दाखल झालेल्या गु.र.नं. १५८/२०१५ च्या अनुषंगाने भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७ (ब) प्रमाणे मंजूरी देण्याबाबत पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांनी दि.०३.०१.२०१७ रोजीच्या पत्राने जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, रत्नागिरी यांना विनंती केली होती. त्याअनुषंगाने जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, रत्नागिरी यांनी दि.२०.०२.२०१७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांचा अहवाल उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना सादर केला होता. सदर प्रकरणी उप संचालक कार्यालयाच्या दिनांक १४.११.२०१७ रोजीच्या आदेशान्वये संबंधित कर्मचाऱ्यांवर खटला भरण्यास अनुमती नाकारली आहे.

(२) व (३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांच्याकडील दि.३०.११.२०१७ व दि. ०३.०१.२०१८ च्या पत्राद्वारे तत्कालीन उप संचालक भुमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून विलंबाबाबत खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुसार तत्कालीन उपसंचालकांनी त्यांच्या दिनांक ०८.१२.२०१७ व दि. २५.०१.२०१८ च्या पत्रान्वये त्यांचा खुलासा जमाबंदी आयुक्त, पुणे यांना सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राजूर (ता.भोकरदन, जि.जालना) येथे वाळू माफियांनी दोन तलाठयांचे अपहरण केल्याबाबत

**(१४) ९६६८४ (२१-१२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूर (ता.भोकरदन, जि.जालना) येथे जप्त केलेले वाळूचे टिप्पर तहसिल कार्यालयामध्ये घेऊन जाणा-या दोन तलाठ्यांचे वाळू माफीयांनी अपहरण केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसुल विभागातील कर्मचा-यांवर वाळू माफियांकडून यापूर्वीसुद्धा हल्ले झाले असून सातत्याने अशा घटना घडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून महसुल विभागातील कर्मचा-यांच्या सुरक्षिततेबाबत तसेच याप्रकारचे हल्ले करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०३-२०१९) :** (१), (२) व (३) माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये मौ.राजूर ता.भोकरदन येथील भरारी पथकाने वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनास जप्त करुन तहसील कार्यालय, भोकरदन येथे नेत असताना सदर वाहनाच्या वाहनचालकाने दोन तलाठी यांच्यासह वाहन पळवून नेण्याचा प्रयत्न केला व तलाठ्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच माहे मार्च,२०१७ मध्ये अंबड तालुक्यात देखील भरारी पथकातील तलाठ्यावर वाळू तस्करांमार्फत हल्ला झाला आहे.

त्यामुळे संबंधितांविरुध्द पोलीस ठाणे, अंबड येथे दि.३१/३/२०१७ रोजी गु.र.नं.६०/११ व पोलीस ठाणे, भोकरदन येथे दि.२४/९/२०१७ रोजी गु.र.नं.४०२/ २०१७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) ९६९८८ (२१-१२-२०१७). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात दहा ठिकाणी हुतात्मा स्मारक असून या स्मारकांच्या देखभाल दुरुस्तीसाठी दिलेल्या निधीतून संबंधित अधिका-यांच्या निष्काळजीपणामुळे एकाही स्माररकाची दुरुस्ती झाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निधीतून सदर स्मारकांची दुरुस्ती न केल्यामुळे निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून हिंगोली जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) सदर १० स्मारकांच्या दुरुस्तीची कामे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सा.बां. विभाग, हिंगोली यांच्याकडे दिनांक २९.०३.२०१७ रोजी दिली असून त्यानुसार डिसेंबर, २०१८ अखेर सर्व कामे पुर्ण झालेली आहेत.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील जायकवाडी धरणामुळे पुनर्वसित झालेल्या २२ गावांची अनेक कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(१६) ९७२७८ (२६-१२-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील जायकवाडी धरणामुळे पुनर्वसित झालेल्या २२ गावांची अनेक कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची असल्याचे दिनांक १६ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास अप्पर जिल्हाधिकारी यांच्या पाहणीतुन निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पाहणीनुसार अपूर्ण व निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०३-२०१९) :** (१) व (२) जायकवाडी प्रकल्पामुळे बाधित नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील २२ गावठाणांमधील नागरी सुविधा कामांची दि. १३ व दि. १५ जुलै, २०१७ रोजी अप्पर जिल्हाधिकारी, अहमनगर यांनी संयुक्त स्थळपहाणी/तपासणी केली असता, त्यांना नागरी सुविधांपैकी काही कामे ही जागा उपलब्ध न झाल्याने अंशत: पूर्ण झाली असल्याचे आढळून आले. तथापि, अशा कामांचे बाबतीत झालेल्या कामाचेच देयक ठेकेदारास अदा करण्यात आले आहे. तसेच दर्जा खालावलेल्या रस्त्यांच्या स्वरुपातील नागरी सुविधा पूर्णत्वानंतर संबंधित जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या असून, तदनंतर चार वर्षाचा कालावधी उलटूनही त्यांची योग्य ती देखभाल दुरुस्ती न झाल्याने वाहतुकीमुळे त्यांची धूप झाली आहे. तर उर्वरीत नागरी सुविधा या प्रकल्पयंत्रणेने पूर्ण केल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जासई-गव्हाण-न्हावे (रा.म.क्र.१०८) (ता.उरण, जि.रायगड) हा रस्ता ओएनजीसी कंपनीला कायमस्वरूपी हस्तांतरीत करण्याबाबत**

**(१७) ९८९३३ (२२-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जासई-गव्हाण-न्हावे (रा.म.क्र.१०८) (ता.उरण, जि.रायगड) हा ८ ते ९ कि.मी. लांबीचा महामार्ग कायमस्वरूपी ओएनजीसी कंपनीला हस्तांतरीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओएनजीसी कंपनीच्या अवजड वाहनांमुळे हा रस्ता वारंवार खराब होत असल्याने वाहतुकीची कोंडी होवून लाखो लिटर इंधन वाया जाऊन नागरिकांना शारीरीक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता ओएनजीसी कंपनीला हस्तांतरीत केल्यास वारंवार दुरूस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणारा खर्च कमी होण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्ता ओएनसीजी कंपनीकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०३-२०१९) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे. रस्त्याची स्थिती चांगली आहे व वाहतुक सुरक्षीत चालू आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) यासंदर्भात रस्ता हस्तांतरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हातील फळबाग लागवडीत वाढ करण्याबाबत**

**(१८) १०५५०१ (०१-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा फळबाग लागवडीत मागे असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मृद व जलसंधारण सचिव यांच्या बैठकीत समोर आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती नाशिक जिल्हातील फळबाग लागवडीत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत अल्पभुधारक शेतकऱ्यांना जॉबकार्ड, बॅक खाते नंबर इ. कागदपत्रे जमा करावी लागतात, मस्टर ठेवावे लागते. त्यामुळे शेतकरी फळबाग लागवडीस उत्सुक नाहीत व बहूभुधारक शेतकरी फळबाग लागवडीस उत्सुक असतात पण या योजनेत पात्र नसल्याने फळबाग लागवड कमी होते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगाव पिंगळा (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील मेगा फूड पार्कचे काम सुरु करण्याबाबत**

**(१९) १०६६५४ (२०-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव पिंगळा (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे प्रस्तावित असलेले मेगा फूड पार्कचे काम सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०३-२०१९) :** (१) होय.
(२) मा.श्री.जयंतराव जाधव, वि.प.स. यांनी नाशिक येथील मेगा फूड पार्कचा प्रस्ताव अनेक दिवसांपासून रेंगाळला असून नाशिकच्या कृषि क्षेत्रातील महत्व लक्षात घेता सदर मेगाफूड पार्कचे काम लवकरात लवकर हाती घेण्याची कार्यवाही करण्याची विनंती मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ०६.११.२०१७ च्या पत्रान्वये केली होती. त्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नाशिक यांनी दिनांक १६.०१.२०१९ रोजी वडगांव पिंगळा, ता.सिन्नर येथील ग्रामस्थांशी चौकशी केली असता श्री.अनंत राजेगावकर, श्री.अनिल जैन व श्रीमती सुंदरा जैन यांच्या एकूण १४७ एकर जमीनीवर मेगाफूड पार्क उभारण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगितल्याचे नमूद केले आहे. सदर क्षेत्राची क्षेत्रीय पाहणी केली असता तिथे सद्य:स्थितीत प्रकल्पाचे कोणतेही काम सुरु नसल्याचे आढळून आले. तसेच यासंदर्भात सरपंच, ग्रामपंचायत यांचेकडे चौकशी केली असता ग्रामपंचायत कार्यालयाने मेगाफूड पार्क उभारणीसाठी बांधकाम परवानगी अथवा अकृषक परवानगी दिली नसल्याचे नमूद केले आहे.

प्रधानमंत्री किसान संपदा योजनेंतर्गत मेगाफूड पार्कची योजना अंतर्भूत असून सदरची योजना केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया मंत्रालयामार्फत राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत उद्योजकांकडून मेगाफूड पार्कचे प्रस्ताव थेट केंद्र शासनाकडे सादर करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर व धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील शासकीय कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्याबाबत**

**(२०) १०६७६८ (२७-०३-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर व धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील महसूल विभागातील कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने नसल्याने सदर कर्मचारी अमरावती तसेच इतर ठिकाणावरून प्रवास करीत असल्यामुळे शासकीय कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील महसूल कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधुन देण्याबाबतची मागणी महसूल कर्मचारी संघटना यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने नांदगाव खंडेश्वर व धामणगाव रेल्वे येथील शासकीय कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०३-२०१९) :** (१) व (२) नांदगाव खंडेश्वर व धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील महसूल विभागातील कर्मचा-यांकरिता निवासस्थाने नसल्याने सदर कर्मचारी अमरावती तसेच इतर ठिकाणावरुन प्रवास करतात. तथापि या कारणास्तव शासकीय कामकाजात अडचणी निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील महसूल कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थान बांधण्याबाबत तहसिलदार, नांदगाव खंडेश्वर यांना निवेदन दिले आहे.
(३) धामणगांव रेल्वे तालुक्यातील महसूल कर्मचाऱ्यांकरीता शासकीय निवासस्थाने बांधण्याचा प्रस्ताव शासनास विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडून प्राप्त झाला आहे. या प्रस्तावास निधी उपलब्धता तसेच नविन दायित्व स्वीकारण्याची मर्यादा यांच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता देण्याचे संकल्पित आहे.

नांदगाव खंडेश्वर येथील इमारत बांधकामासाठी जागा निश्चितीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बडनेरा यांच्या विचाराधीन असून सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मोहन पुरम सेंट्रल को.हौ.सोसायटी आणि स्वामी देवप्रकाश गार्डन्स को.हौ.सोसायटीमधील सदनिकांच्या खरेदी-विक्रीवरील बंदी उठविण्याबाबत**

**(२१) १०९४२७ (२७-०३-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मोहन पुरम सेंट्रल को.हौ.सोसायटी आणि स्वामी देवप्रकाश गार्डन्स को.हौ.सोसायटीमधील सदनिकांच्या खरेदी-विक्रीच्या नोंदणी प्रक्रियेवर बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बंदी उठविण्याबाबतची मागणी अंबरनाथ येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मोहन पुरम सेंट्रल को.हौ.सोसायटी आणि स्वामी देवप्रकाश गार्डन्स को.हौ.सोसायटीमधील सदनिकांच्या खरेदी-विक्रिवरील बंदी उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०३-२०१९)** : (१) होय.

जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दि.१५ डिसेंबर, २००६ चे आदेशान्वये तहसिलदार अंबरनाथ यांनी सर्व्हे नं.३८ पै. या जमिनीचे कोणतेही व्यवहार नोंदणी करु नयेत असे दि. १६ एप्रिल, २००७ चे पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

मोहन पूरम सेंट्रल को.हौ. सोसायटी आणि स्वामी देवप्रकाश गार्डन्स को. हौ. सोसायटीमधील सदनिकांच्या खरेदी-विक्रीवरील बंदी उठविण्याबाबत कार्यवाही करण्याचे संबंधितांना आदेशित करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री तसेच मा.मंत्री(महसूल) महोदयांकडे दिनांक ०९ जानेवारी, २०१८ रोजी निवेदनान्वये विनंती केली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी नमुद सोसायटीमधील सदनिकांच्या खरेदी-विक्रीवर जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दि.१५ डिसेंबर, २००६ चे आदेशान्वये बंदी घालण्यात आली असल्याने लोकप्रतिनिधींचे उक्त निवेदन नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे उचित कार्यवाहीकरिता पाठविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयात शेंदरी बोंडअळीमुळे शेतक-यांचे झालेले नुकसान

**(२२) ११२८२९ (०१-०४-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात शेंदरी बोंडअळीमुळे कापसाच्या दोन लाख ६३ हजार हेक्टर कोरडवाहू क्षेत्रातील चार लाख २३ हजार शेतक-यांचे नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील शेतकरी चार वर्षापासून नैसर्गिक संकटाचा सामना करीत असुन सन २०१७ मध्ये दहा तालुक्यातील ११६८ गावांतील खरिपांची अंतिम आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी आली आहे तरी उर्वरित सहा तालुक्यांतील आणेवारीही ६७ पैशांपेक्षा कमी जाहीर झाल्याने दुष्काळाची दाहकता अधिक असल्याने यानुसार कृषी, महसूल व जिल्हा परिषद प्रशासनाच्या निदर्शनास आल्याने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून (एनडीआरएफ) मिळणा-या हेक्टरी सहा हजार आठशे रुपयांनुसार २८ डिसेंबर रोजी १७६ कोटी १२ लाख ६४ रुपयांची मागणी केली आहे परंतू एनडीआरएफ व्यतीरिक्त पीक विमा व बियाणे कंपनीकडून मिळणा-या निधीचा यात समावेश नसल्याने शेतक-यांची आर्थिक गैरसोय होत आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०३-२०१९) :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(२), (३) व (४) नांदेड जिल्ह्यात सन २०१७ च्या खरीप हंगामामध्ये कापूस पिकावर झालेल्या बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे व धान पिकावर झालेल्या तुडतुडे रोगाच्या प्रादुर्भावामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी नांदेड जिल्ह्यासाठी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात अनुक्रमे रु. ४६९७ लक्ष, रु. ७०४५ लक्ष व रु. ४१९३.६४ लक्ष असे एकूण रु. १५,९३५.६४ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला.

त्यानुसार संबंधित तहसिलदारांमार्फत ३,६४,४४४ बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर एकूण रु. १,५०,४३,०१,७९०/- जमा करण्यात आलेला आहे. यामध्ये पीक विमा योजना व बियाणे कंपनीकडून मिळणाऱ्या निधीचा समावेश नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाचोरा-भडगांव विधानसभा मतदार संघातील रेल्वे ओव्हर ब्रीजच्या (आर.ओ.बी.) मंजूरीबाबत

**(२३) ११३०७० (२७-०३-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा-भडगांव विधानसभा मतदार संघातील रेल्वे ओव्हर ब्रीजच्या (आर.ओ.बी.) मंजूरीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित पुलाबाबत निकष,मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा सालेबर्डी (पांधी) ता.जि.भंडारा येथील प्रकल्पग्रस्तांना तातडीने भूखंड व पट्टे वाटप करण्याबाबत

**(२४) ११३१६६ (०१-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा सालेबर्डी (पांधी) ता.जि. भंडारा येथील प्रकल्पग्रस्तांना तातडीने भूखंड व पट्टे वाटप करणे संदर्भात स्थानिक लोकप्रतीनिधीनी दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी पुनर्वसन भंडारा यांना पत्र दिले त्यानुसार तहसीलदार भंडारा यांना दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ च्या लेखी पत्रानुसार भूखंड वाटप करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती तहसीलदार भंडारा यांच्या स्तरावरून तातडीने प्रकल्पग्रतांना भूखंड व पट्टे वाटपाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, भंडारा यांचे पत्र दि.१०.१०.२०१७ नुसार भूखंड वाटपाची कार्यवाही तातडीने पार पाडण्याच्या दृष्टीने मौजा-सालेबर्डी (पांधी) या गावाचे प्रारंभिक यादीला अंतीम करण्याच्या अनुषंगाने तहसिलदार, भंडारा यांना कळविण्यात आले आहे.

(२) व (३) मौजा -सालेबर्डी (पांधी) गावाचे प्रारंभिक यादीवर गावकऱ्यांकडून एकूण ६९ आक्षेप प्राप्त झाली असून एकूण २५३ लाभधारकांची यादी अंतीम करण्यात आली असून त्यानुसार तहसिलदार, भंडारा यांचेकडून दि.७.४.२०१८ रोजी ईश्वर चिठठी काढून भूखंड वाटप करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. दि.२१.५.२०१८ पासून दि.२८.६.२०१८ पर्यंत २५३ प्रकल्पग्रस्तांपैकी २२० प्रकल्पग्रस्तांना भुखंड व पटटे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

त्यानंतर दि.२९.६.२०१८ ते दि.२९.१.२०१९ पर्यंत २५३ प्रकल्पग्रस्तांपैकी एकूण २३७ प्रकल्पग्रस्तांना भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित १६ प्रकल्पग्रस्तांनी अजुनपर्यंत तहसिल कार्यालयाशी संपर्क न केल्यामुळे त्यांना पटटे देणे शिल्लक आहे. उर्वरित १६ प्रकल्पग्रस्तांनी संपर्क केल्यानंतर तयार करुन ठेवण्यात आलेले भुखंडाचे पटटे प्रकल्पग्रस्तांना देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उमरगा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना गुन्हेगाराप्रमाणे वागणूक दिल्याबाबत

**(२५) ११६२२४ (०१-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील मुरूम, आलूर, केसरजवळगा, येणेगुर, बेळंब, कोथळी, कंटेकूर, चिंचोली, गुंजोटी, कदेर, औराद, मुगळी, एकोंडी, एकोंडीवाडी इत्यादी अनेक गावांना गारपिटीचा तडाखा बसला आहे. तेथील शेतातील नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी महसूल विभागाच्या पथकाने शेतकऱ्यास शेतात उभे केले व हातात नाव लिहिलेल्या पाट्या देऊन त्यांचे फोटो काढले असे दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उस्मानाबादचे पालकमंत्री आणि कृषी मंत्री यांनी सदर प्रकरणी चौकशी करून ज्या अधिकाऱ्यांनी हा गंभीर प्रकार केला त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे फोटो काढण्याच्या शासनाच्या कोणत्याही सूचना नसल्याचे मंत्री महोदय यांनी म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हातात पाट्या देऊन शेतकऱ्यांचे फोटो काढल्यामुळे गुन्हेगाराप्रमाणे वागणूक दिली असे वाटून शेतकऱ्यांकडुन तीव्र संताप व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती शेतक-यांना गुन्हेगारांप्रमाणे वागविणा-या व या प्रकरणास जबाबदार असणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) दिनांक ११ व १२ फेब्रुवारी २०१८ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व उस्मानाबाद तालुक्यांमध्ये झालेल्या अवेळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीपिकांचे व फळपिकांचे नुकसान झाल्याचे दिसून आले. दिनांक ०९.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये माहे जून ते ऑक्टोबर २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना पिक नुकसानीवर मदत जाहीर करण्याबाबत अटी व शर्ती नमूद असून, त्यामध्ये शेती व फळपिकांच्या ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसानग्रस्त क्षेत्राच्या पंचनाम्यासोबत GPS enabled छायाचित्र घेणे आवश्यक राहील. उभे पीक, त्यांचे नुकसान या सर्व बाबी व संबंधित शेतकरी शेतात उभे असल्याचे GPS enabled छायाचित्र घेण्यात यावे, याप्रमाणे पंचनामा पूर्ण झाल्याची खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी असे नमूद आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील एकोंडी (ज.) या गावाचे पीक नुकसानीचे सर्वेक्षण व पिक पंचनामे करताना नुकसानीचे क्षेत्र जास्त असल्याने, पंचनामे करण्यासाठी विलंब होऊ नये म्हणून संबंधित शेतकऱ्यांसोबत त्यांचे नाव, गट नं. लिहिलेला फलक/पाटी देण्यात आली होती. परंतु सदर शेतकऱ्यांचे फोटो पाहिल्यानंतर अशा प्रकारचे फोटो काढणे बंद करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, उमरगा यांनी संबंधीत सर्वेक्षण व पंचनामे करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना त्यावेळी सक्त ताकीद दिली. त्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी शेतकऱ्यांचे फलकासह फोटो काढणे त्याच दिवशी थांबविले होते.

या प्रकरणाशी संबंधित उपविभागीय अधिकारी उमरगा, तहसीलदार उमरगा, मंडळ कृषी अधिकारी उमरगा, तलाठी एकोंडी (ज.), कृषी सहायक एकोंडी (ज.) यांना कारणे दाखवा नोटीसा देऊन खुलासा मागविण्यात आला. संबंधितांनी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना खुलासा सादर केला असून, त्यानुषंगाने संबंधितांना यापुढे अशी कृती झाल्यास गांभीर्याने दखल घेतली जाईल व कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घेण्याबाबतची समज देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याचे कृषि मंत्री अतिरिक्त दोन व कृषि राज्यमंत्री**
**अतिरिक्त एक वाहन वापरत असल्याबाबत**

**(२६) ११६३८२ (१४-०५-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय परिवहन सेवेतील वाहन ताफा रद्द करून मंत्री व राज्यमंत्र्याच्या कामकाजाकरिता शासन प्रत्येकी एक वाहन उपलब्ध करून देत असतांना राज्याचे कृषि मंत्री अतिरिक्त २ व कृषि राज्यमंत्री अतिरिक्त १ वाहन वापरत असल्याचे माहितीच्या अधिकारात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
व चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०३-२०१९) :** (१) याबाबत माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत विभागामध्ये अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) या विभागाच्या अभिलेखानुसार मा.मंत्री (कृषि), मा.राज्यमंत्री (कृषि), मा.मंत्री (पदुम) व मा.राज्यमंत्री (पदुम) यांना नियमानूसार प्रत्येकी एक वाहन उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घाटंजी (जि.यवतमाळ) तहसील कार्यालयात प्रतीक्षालयाची निर्मिती करण्याबाबत

**(२७) ११९४४९ (२०-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि.यवतमाळ) तहसील कार्यालयात प्रतीक्षालय नसल्याने तालुक्यातील नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसीलमध्ये प्रतीक्षालयाची निर्मिती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तहसील कार्यालयात प्रतीक्षालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०३-२०१९) :** (१) घाटंजी तहसिल कार्यालयात प्रतिक्षालय नाही. परंतु अभ्यागत यांना बसण्याकरीता व्हरांड्यामध्ये बाकांची सोय करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) तहसिल कार्यालयात प्रतिक्षालय निर्मितीबाबत उचित कार्यवाही करण्याचे उप अभियंता, सा.बां. वि., घाटंजी यांना कळविण्यात आले असून त्यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपळनेर (ता.जि.बुलढाणा) येथील शासकीय जागेचे कौलपट्टे तेथील नागरिकांच्या नावे करुन देण्याबाबत

**(२८) १२०६३६ (२०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळनेर (ता.जि.बुलढाणा) येथील वॉर्ड नं.१७ (प्रभाग ४) येथील शासकीय जागा नागरिकांना राहण्याकरिता दिलेली असून संबंधित नागरिक ४५-५० वर्षापासून तेथे राहत असताना सदर जागेची असेसमेंट "शासकीय जागा" म्हणून मिळत असल्याने त्यांचे कौलपट्टे त्यांच्या नावाने करुन देण्याबाबत तेथील नागरिकांनी वारंवार संबधित अधिका-यांकडे निवेदने दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार या जागेतील कौलपट्टे येथील नागरिकांच्या नावे करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०३-२०१९) :** (१) व (२) प्राप्त माहितीनुसार मौजे पिंपळनेर, ता.देऊळगांवराजा येथील वार्ड नं.१७ मधील शासकीय जमिनीवर १८३ नागरिकांनी अतिक्रमण केलेले असून सदरहू जागेचे पट्टे त्यांच्या नावे करून देण्याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती, तहसिलदार, देऊळगांवराजा व नगर परिषद, देऊळगांवराजा यांचे कार्यालयाकडे निवेदने प्राप्त झालेली नाहीत.सबब, कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा शिरपूर (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील दत्तमंदिर संस्थानाच्या ताब्यातील बांधकाम व जागा नियमानुकूल करणेबाबत

**(२९) १२०६६८ (२०-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा शिरपूर (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील सर्वे क्र.४, ५ व ६ मधील ५५०० चौरस मीटर जागा सन १९६१ पासून दत्तमंदिर संस्थांनाच्या ताब्यात असून उक्त संस्थानाच्या अध्यक्षांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी तहसिलदार, नांदगाव खंडेश्वर यांचेकडे संस्थानाच्या ताब्यातील बांधकाम व जागा नियमाकुल करुन देणेबाबत अर्ज केल्याचे व त्याबाबतचे दस्ताऐवज सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थानाच्या ताब्यातील बांधकाम व जागा नियमाकूल करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी तहसिलदार, नांदगाव खंडेश्वर यांना पत्राद्वारे लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून संस्थानाच्या ताब्यातील जागा व त्यावरील बांधकाम नियामानुकुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०३-२०१९) :** (१) व (२) होय.
(३) विषयांकित प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने तहसिलदार, नांदगांव खंडेश्वर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती व इतर ३ क्षेत्रीय कार्यालयांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे मागविण्यात आलेली आहेत. सदरहू कार्यालयांची ना-हरकत प्रमाणपत्रे/मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भाडेपट्टयाने अथवा कब्जेहक्काने दिलेल्या जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ करताना अधिमुल्य न आकारण्याबाबत

**(३०) १२६४६३ (३०-११-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजित पवार (बारामती), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध घटकांना प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनींचा धारणाधिकार रुपांतरीत करताना अवलंबिण्याची कार्यपद्धती, अटी व शर्ती, अधिमुल्य इत्यादीबाबत शिफारशी करण्यासाठी शासनाने महसूल विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आठ सदसीय समितीने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशीमध्ये अंशतः बदल करून त्यास मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती औद्योगिक, शैक्षणिक, धर्मादाय, जिमखाना, क्रीडांगणे व सहकारी गृहनिर्माण संस्थाना भाडेपट्टयाने अथवा कब्जेहक्काने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींचा धारणाधिकार वर्ग २ मधून वर्ग १ रुपांतरीत करताना प्रचलित वार्षिक मूल्य दर तक्त्यातील रेडी रेकनरच्या २५ ते ५० टक्के अधिमुल्य आकारण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सहकारी गृहनिर्माण संस्थाना भाडेपट्टयाने अथवा कब्जेहक्काने प्रदान केलेल्या जमिनींबाबत वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे अधिमुल्य आकारण्यात येऊ नये अशी मागणी सहकारी गृहनिर्माण संस्थांनी मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तुत धोरणामध्ये सद्यस्थितीत औद्योगिक, शैक्षणिक, धर्मादाय, जिमखाना व क्रिडांगण यासाठी प्रदान केलेल्या जमिनीचा समावेश नाही. तथापि, कृषिक तसेच निवासी किंवा वाणिज्यिक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग-२ धारणाधिकारावर किंवा भाडे पट्टयाने प्रदान केलेल्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्यास राज्य मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार प्रारुप नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) विविध व्यक्ती व संस्था यांचेकडून प्राप्त हरकती व सूचनांची नोंद घेवून उक्त नियम अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील नायब तहसलिदार संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३१) १२६९०७ (३०-११-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खुल्या प्रवर्गातील ७२ हजार जागा व मागासवर्गीयांच्या ५० हजार रिक्त पदांचा अनुशेष असून केवळ धुळे जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयात निम्म्यापेक्षा अधिक नायब तहसलिदार संवर्गातील पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे धुळे जिल्हयातील महसूल विभागातील अनेक कामे प्रलंबित झाली असून त्यामुळे नागरीकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून धुळे जिल्हयातील महसूल विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०३-२०१९) :** (१) धुळे जिल्ह्यामध्ये नायब तहसिलदार संवर्गाची एकूण ३१ पदे मंजूर असून त्यापैकी २० पदे भरलेली असून ११ पदे रिक्त आहेत
(२), (३) व (४) महसूल विभागातील कामे वेळेवर पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
राज्यातील विविध महसूल विभागातील नायब तहसिलदार संवर्गाच्या सरळसेवा कोटयातील रिक्त पदांच्या अनुषंगाने एकत्रित मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहे. तसेच नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देऊन पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त नाशिक यांचे स्तरावरुन करण्यात येत आहे.

---

**पाली (ता.जि.बीड) येथील वृद्ध महिलेने मंत्रालयासमोर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबाबत**

**(३२) १२७०१९ (३०-११-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली (ता.जि.बीड) येथील एका ७५ वर्षीय वृद्ध महिलेने स्वत:च्या नावावरची १० आर जमीन रद्द झाल्यामुळे माहे १ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयासमोर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असून यापूर्वी अनेक वेळा असे प्रकार घडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर महिलेला न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०३-२०१९) :** (१), (२) व (३) श्रीम.राधाबाई कुंडलीक साळुंके यांनी मा.राज्यमंत्री (महसूल) यांच्या दि.२५.०७.२०१८ रोजीच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याची मागणी केली होती. त्यानुषंगाने मा.राज्यमंत्री (महसूल) यांनी पुन्हा सुनावणी आयोजित करुन दि.२८.०१.२०१९ रोजी निर्णय दिला असून श्रीमती साळुंके यांचा पुनर्विलोकन अर्ज मान्य केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील द्वारका चौफुलीवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी द्वारका ते बिटको दरम्यान उड्डाणपूल बांधण्याबाबत**

**(३३) १२८०२३ (०४-१२-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील द्वारका चौफुलीवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सर्कलचा आकार कमी करून वाहतूक सिग्नल बसविण्याचा पर्याय असल्याचे नाशिक महानगरपालिका आयुक्तांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, द्वारका ते बिटको दरम्यान उड्डाणपूल बांधण्याकरिता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने माहे आक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सल्लागार संस्थेची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने लवकरात लवकर कार्यवाही व उपाययोजना करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

नाशिक महानगरपालिका आयुक्तांनी व्दारका चौफुलीवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सर्कलचा आकार कमी करण्याकरिता तसेच या ठिकाणी वाहतूक सिग्नल बसविण्याकरिता सूचित केले असल्याचे केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

व्दारका ते बिटको दरम्यान उड्डाणपूल बांधण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरिता सल्लागार नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न भाग (१) व (२) बाबत केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत कार्यवाही हाती घेण्यात आली असून त्यांचेमार्फत प्रस्तुत प्रकरणी पुढीलप्रमाणे माहिती कळविण्यात आली आहे.

अ) सदयस्थितीत या ठिकाणी वाहतूक सिग्नल बसविण्यात आले आहेत.

ब) सदर ठिकाणच्या अतिदाट वाहतूक भागामधील अस्तित्वातील सोईसुविधा विचारात घेवून सर्कलचा आकार कमी करण्याच्या अनुषंगाने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत वाहतूक तज्ञ व इतर संबंधितांशी संपर्क साधून विविध पर्यायांपैकी एक पर्याय निश्चित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

क) तसेच व्दारका ते बिटको दरम्यान उड्डाणपूल बांधण्याबाबत नियुक्त सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.
(४) अ.क्र.२ व ३ मधिल हाती घेण्यात आलेली कार्यवाही विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी विलंब झाला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदूरबाजार (जि. अमरावती) येथील प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास निधी देण्याबाबत**

**(३४) १२८०६१ (३०-११-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी मान्यतेकरीता प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बांधकामासाठी ६,५७,२३,००० रुपयांचा निधी शासन किती कालावधीत उपलब्ध करून देणार आहे व विभागीय आयुक्त यांनी शासनाला किती रुपयांचे अंदाजपत्रक मान्यतेकरीता पाठविले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१९) :** (१) व (२) होय.

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी रु.६५७.२३ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक शासनास सादर केले होते. छाननी अंती रु.७९४.६९ लक्ष च्या अंदाजपत्रकास शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.२४५/इमारत-३ दि.२० डिसेंबर २०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या कामास निधी व निकषच्या अधिन राहून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात बनावट बिनशेती परवान्याआधारे दस्तावेज नोंदणी करण्यात येत असल्याबाबत

**(३५) १२८५०६ (३०-११-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात बनावट बिनशेती परवान्याआधारे दस्तावेज नोंदणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तहसीलदार भिवंडी यांना बनावट दस्तावेज करणाऱ्या विकासकावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार भिवंडी तालुक्यातील किती विकासकांवर आतापर्यंत गुन्हे दाखल करण्यात आले वा येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०३-२०१९) :** (१), (२) व (३) भिवंडी तालुक्यातील मौजे काल्हेर, कशेळी येथील नवीन शर्तीने वाटप केलेल्या जमिनीवर होत असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १२/०२/२०१८ रोजी मौजे काल्हेर, कशेळी परिसरास भेट देऊन पाहणी केली. सदर पाहणीदरम्यान मौजे काल्हेर, ता.भिवंडी येथील स.नं. १४ व इतर या नवीन शर्तीने वाटप केलेल्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम केल्याचे, तसेच त्यासाठी मौजे काल्हेर, ता.भिवंडी येथील स.नं. ११४ या

जमिनीचा बनावट बिनशेती आदेश तयार करुन ग्राहकांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधिताविरुध्द नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी येथे दिनांक २३/०२/२०१८ व दिनांक २४/०२/२०१८ रोजी एकूण १९ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

---

## सातारा-पंढरपूर महामार्गाचे काम करणा-या ठेकेदाराने अनेक ठिकाणी मातीचे ढीग टाकल्याने झालेले नुकसान

**(३६) १२९२२३ (३०-११-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा-पंढरपूर महामार्गाचे काम करणा-या ठेकेदाराने अनेक ठिकाणी मोठमोठे मातीचे ढीग टाकल्याने पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळे निर्माण होऊन दहिवडी मधील पिंगळी, सत्रेवाडीत (ता.माण, जि.सातारा) स्थानिक नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी शिरून मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार यास जबाबदार असणा-या ठेकेदारांवर कारवाई करून नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०३-२०१९) :** (१) सप्टेंबर, २०१८ मध्ये सत्रेवाडी येथे (सा.क्र. ५६+००) रस्त्यासाठी केलेल्या भरावामुळे पावसाच्या पाण्याचा पुरेसा निचरा न होवून एका नागरिकाच्या घरासमोर पावसाचे पाणी साठले होते. तथापि, त्याठिकाणी त्वरीत पाईप्स टाकून सदर पाणी उताराच्या दिशेने वळविण्यात आले आहे. याबाबत प्रकल्पाचे कंत्राटदार व ॲथोरिटी अभियंता यांनी त्वरीत कृती केल्याने नुकसान झालेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी प्रकल्पाचे कंत्राटदार व ॲथोरिटी अभियंता यांनी त्वरीत कृती केल्याने नुकसान झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हयातील वाळू गटांच्या लिलावाबाबत

**(३७) १२९३२४ (३०-११-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील वाळू गटांची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी संपणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार जिल्हयातील वाळू गटांसाठी नवीन लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, किती वाळू गटांचा लिलाव करण्यात आला व त्यातून किती कोटी रुपयांचा महसूल शासनास प्राप्त झाला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०३-२०१९) :**
(१) होय.
(२) व (३) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या दि.१५/१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार ० ते ५ हेक्टर क्षेत्रातील वाळूगटांसाठी पर्यावरण अनुमती जिल्हास्तरीय पर्यावरण समिती यांच्यामार्फत देण्याची तरतूद आहे. तथापि, सदर अधिसूचनेस मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने त्यांच्या दि.११/१२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये नविन अधिसूचना प्रसिध्द होईपर्यंत निलंबित केले आहे. त्यामुळे सर्व वाळूगटांच्या पर्यावरण मान्यतेचे प्रस्ताव राज्यस्तरीय पर्यावरण समितीसमोर सादर करणेबाबत दि.१५/१२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार वाळू लिलाव सन २०१८-१९ साठी प्रस्तावित वाळूगटांच्या पर्यावरण मान्यतेचे प्रस्ताव राज्यस्तरीय पर्यावरण समितीकडून मंजूर करुन घेऊन ई-लिलाव करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) येथे मुलींच्या शासकीय वसतीगृहासाठी जागा देण्याबाबत

**(३८) १२९७४९ (३०-११-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) येथे मुलींच्या शासकीय वसतीगृहाकरिता इमारत संरक्षणासाठी जुना सर्व्हे क्र.५२५ व नविन सर्व्हे. न. ३७३ मधील विना वापर असलेली ०.९१ हे.आर जागा मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे वारंवार लेखी निवदने दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलींच्या शासकीय वसतीगृहाच्या इमारतीसाठी सदर जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०३-२०१९) :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे दिनांक ०६/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये तिवसा, जि.अमरावती येथील पंचायत समितीच्या वसाहतीची खुली जागा मागासवर्गीय मुलीच्या वसतीगृहासाठी देण्याची

मागणी केली होती. तथापि, तहसिलदार, तिवसा यांनी गृहपाल, मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, तिवसा, ता. तिवसा यांना मौजा तिवसा, सुरवाडी खु. व सुरवाडी बु. या गावांना लागून मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह इमारत बांधकाम करण्याकरीता ई-वर्ग जमीन उपलब्ध नसल्याबाबत दि. ०८/०६/२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुका भूमीअभिलेख कार्यालयातील गैरकारभारबाबत**

**(३९) १२९९०७ (३०-११-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरपूर (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती ) येथील शेत सर्वे क्र. ५१/२ ची मोजणी करण्याकरीता मोजणी शुल्काचा भरणा २६ फेब्रुवारी, २०१८ रोजी करण्यात आला असताना तालुका भूमी अभिलेख कार्यालय, नांदगाव खंडेश्वर यांच्याकडुन दिनांक १ ते ७ एप्रिल व दिनांक १६ मे,२०१८ रोजी मोजणी करण्याच्या नोटीस देऊनही दिलेल्या तारखेस शेताची मोजणी करून देण्याबाबत कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) भूमी अभिलेख कार्यालयाकडून अनेक प्रकरणी शेतकऱ्यांना शेत मोजणीसाठी तारीख देऊनही दिलेल्या तारखांना शेतमोजणी करण्यात येत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून शेत मोजणीस विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०३-२०१९) :** (१) मौजे शिरपुर, ता.नांदगांव जि.अमरावती येथील स.नं.५१/२ ची मोजणी करणेसाठी श्री.विठ्ठल बळीराम चांदणे यांनी उपअधीक्षक भूमि अभिलेख, नांदगाव खंडेश्वर कार्यालयात दि.२६.०२.२०१८ रोजी अर्ज दाखल केला होता. ई मोजणी आज्ञावली मार्फत मोजणी दि.१८.०४.२०१८ रोजी निश्चित करणेत आली होती. परंतू सदर दिवशी अमरावती जिल्ह्यामध्ये स्थानिक सुट्टी असल्यामुळे ई-मोजणी आज्ञावलीमध्ये नियोजनात बदल करुन दि.२५.०४.२०१८ रोजी मोजणी तारीख निश्चित करण्यात आली होती. तशा मोजणी नोटीसा अर्जदार व संबंधित लगत धारकांना बजाविणेत आल्या होत्या. परंतू सदर दिवशी संबंधित भूमापक यांना मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी अंतर्गत सौर उर्जा प्रकल्पातील मोजणी प्रकरणी पाठविणेत आले. त्यामुळे दि.२५.०४.२०१८ रोजी मोजणीची कार्यवाही करता आली नाही.

त्यानंतर पुन्हा ई-मोजणी आज्ञावलीद्वारे नियोजनात बदल करुन दि.२२.०५.२०१८ ही मोजणी तारीख निश्चित करणेत आली होती. मात्र सदर दिवशी संबंधित भूमापक हे आजारी असलेने त्यांनी दि.२१.०५.२०१८ रोजी कार्यालयात किरकोळ रजेचा अर्ज दाखल केला होता. त्यामुळे सदर दिवशी मोजणी झालेली नाही. नांदगाव खंडेश्वर कार्यालयाच्या आस्थापनेवर एकच भूकरमापक उपलब्ध असलेने वेळेवर दुसरा कर्मचारी उपलब्ध करुन देता आला नाही. त्यानंतर दि.२८.०५.२०१८ रोजी तारीख नेमून व मोजणीची पुर्व कल्पना अर्जदार यांना देऊन भूमापक हे मौक्यावर गेले असता अर्जदार हजर नसल्याने मोजणीकाम करता आले नाही. तसा पंचनामा भूमापक यांनी नोंदविला आहे.

सदर प्रकरणी अर्जदार श्री.विठ्ठल बळीराम चांदणे यांनी दि.१४.०६.२०१८ रोजी उप अधीक्षक भूमि अभिलेख नांदगांव खंडेश्वर कार्यालयात मी केलेली तक्रार बिनशर्त मागे घेत असून याबाबत माझी भविष्यात कोणतीही तक्रार राहणार नाही, तसेच मला आता मोजणीची आवश्यकता नाही. तरी माझे मोजणी प्रकरण विनाकार्यवाही निकाली काढणेस हरकत नाही असा अर्ज दाखल केला आहे. त्यानुषंगाने उपअधीक्षक भूमि अभिलेख, नांदगांव खंडेश्वर यांनी दिनांक ३०.०६.२०१८ च्या पत्रान्वये विनाकार्यवाही प्रकरण निकाली काढल्याचे कळविले आहे.

(२) व (३) उप अधिक्षक भूमि अभिलेख, नांदगांव खंडेश्वर या कार्यालयातील कारभाराबाबत श्री. विठ्ठल बळीराम चांदणे व सुरेश राजापुरे यांनी उप संचालक भूमि अभिलेख, अमरावती कार्यालयाकडे तक्रारी केल्या होत्या. त्याअनुषंगाने उपअधीक्षक भूमि अभिलेख, नांदगाव खंडेश्वर कार्यालयाची उपसंचालक भूमि अभिलेख अमरावती कार्यालयातील नियुक्त विशेष पथकाद्वारे दप्तर तपासणी करण्यात आली. तपासणी पथकाने सादर केलेल्या निरीक्षण ज्ञापनानुसार मौजे शिरपूर येथील मोजणी प्रकरणासह एकुण १५ प्रकरणे मुदतबाह्य असल्याचे निदर्शनास आले. शिरपूर येथील तक्रारी अर्जाच्या ३ प्रकरणांमध्ये झालेल्या विलंबाबाबत संबंधितांवर विभागीय चौकशी प्रस्तावित करणेच्या सुचना उपसंचालक भूमि अभिलेख, अमरावती यांनी जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती यांना दि. १२.०९.२०१८ रोजी दिलेल्या आहेत.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### उल्हासनगर (जि. ठाणे) येथील प्रशासकीय इमारतींचे काम रखडल्याबाबत

**(४०) १३०००७ (३०-११-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील उल्हासनगर-४ येथील तहसील कार्यालय व उल्हासनगर-३ मधील पवई चौक येथील प्रांत कार्यालय अशा दोन्ही प्रशासकीय इमारतींना २ वर्षापूर्वी शासनाने मंजूरी देवून निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नकाशा तयार करतांना सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधकामाला अडथळा ठरणाऱ्या विद्युत पोल व तारांचा विचार न केल्याने उल्हासनगर-३ येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम रखडले असून पोल व तारा हटविण्याचा प्रस्ताव पाठवून १ वर्षाचा कालावधी होवूनही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर इमारतीच्या बांधकामास तातडीने सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१९) :** (१) होय.

(२) हे, अंशत: खरे आहे. परंतु उल्हासनगर कॅम्प क्र.३ येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकामास अडथळा ठरणा-या विद्युत पोल व तारा हया सा.बां. विद्युत उपविभाग कल्याण यांचे मार्फत निविदा प्रक्रीया दि. १०/९/२०१८ रोजी पूर्ण करुन दि. ०१/१०/२०१८ पर्यंत इमारतीवरील विद्युत वाहिनी व विद्युत खांब हटविण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील भूमिअभिलेख कार्यालयात ७८ पदे रिक्त असल्याबाबत

**(४१) १३०८१९ (३०-११-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील भूमिअभिलेख कार्यालयातील ७८ पदे रिक्त असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे मोजणीची सुमारे ३,४०६ प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०३-२०१९) :** (१) होय, माहे नोव्हेंबर, २०१८ अखेर कोल्हापूर जिल्ह्यात गट-ब संवर्गातील १, गट-क (पदसमूह ४) संवर्गातील ३९ पदे व गट-ड संवर्गातील ४१ पदे अशी एकूण ८१ पदे रिक्त आहेत.

(२) माहे नोव्हेंबर २०१८ अखेर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सर्व प्रकारची मिळून एकूण २४०५ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३) सेवानिवृत्ती व पदोन्नतीमुळे पदे रिक्त झालेली आहेत.

(४) विभागीय मागासवर्गीय कक्षाकडून बिंदू नामावली तपासणीनंतर पदोन्नतीची रिक्त पदे भरण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीची सभा घेवून प्रशासकीय निकड विचारात घेवून पद भरण्याची दक्षता जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या स्तरावरुन घेण्यात येत आहे. तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२०/आ.पु.क., दि. १६.०५.२०१८ मध्ये भूमि अभिलेख विभागाचा समावेश करुन विभागातील गट - क संवर्गातील रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्याची वित्त विभागास विनंती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंत्रालयातील उंदीर मारण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४२) १३०९७७ (३०-११-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयातील उंदीर मारण्यासाठी दिनांक ३ मे, २०१६ रोजी मे.विनायक मजूर सहकारी संस्था लिमिटेड यांना कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.शेडगे यांचा टेंडर भरण्याच्या खूप आधीच मृत्यू झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मयत संचालकाच्या नावाने आणि स्वाक्षरीने सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाच्या निवीदा स्वीकारल्या असून काम पूर्ण झाल्यानंतर कामाची रक्कमही मे.विनायक मजूर सहकारी संस्था लिमिटेड यांच्या नावाने अदा करण्यात आली व सदरची रक्कम अन्य व्यक्तीने परस्पर हस्तगत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व काम देताना उक्त संस्थेची विश्वासार्हता शासनाने तपासली होती काय,
(४) असल्यास, सदर काम बेकायदेशीरपणे अनधिकृत संस्थेच्या आणि अधिकाऱ्यांच्या मर्जीने देवून शासकीय रकमेचा अपहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर व संस्थेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मे.विनायक मजूर सहाकारी संस्थेच्या मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील चालू खात्यात देयकाची रक्कम जमा करण्यांत आली आहे.
(३), (४) व (५) या कामासंदर्भात श्री. शेख वलांडीकर, लातूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग,मुंबई यांनी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांना चौकशी करण्याबाबत निर्देशीत केले असून चौकशी प्रगतीत आहे.

---

## वाघजाई देवी देवस्थान, तरसवाडी (ता.खटाव, जि.सातारा) या देवस्थानच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(४३) १३१४४१ (३०-११-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघजाई देवी देवस्थान, तरसवाडी (ता.खटाव, जि.सातारा) या देवस्थानची मोठी शेतजमीन (इनाम जमीन) लगतच्या मौजे विभूतवाडी (ता.आटपाडी, जि.सांगली) हद्दीत (तरसवाडी-विभूतवाडी गावच्या हद्दीलगत) आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतजमीनीवर गेल्या ३४-३५ वर्षांपासून श्री.नारायण पांडुरंग तरसे व इतर ४ जणांनी घरे व बोअर विहिरी बांधून व शेती करुन अतिक्रमण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, महसूल यांच्याकडे सदर जमीनीवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींविरोधात कारवाई करुन सदर जमीनीचा ताबा देवस्थानास परत मिळवून देण्याबाबतची लेखी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी गेल्या ३५-४० वर्षांपासून सदर जमीनीचे उत्पन्न अनधिकृतपणे घेत असलेल्या संबंधिताकडून उत्पन्नाची रक्कम वसुल करुन सदर जमीनीचा ताबा वाघजाई देवी देवस्थानाकडे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०३-२०१९) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) श्री.नारायण पांडुरंग तरसे व इतर ४ व्यक्तींच्या ताब्यात असलेली श्री.वाघजई देवस्थानाच्या जमीनीचा व त्यामध्ये असलेल्या घरांचा ताबा काढून घेऊन मुळ वहिवाटदार ताय्यप्पा तुका तरसे यांचे वारस धनाजी पांडूरंग मुळीक यांच्या ताब्यात दि. १९/११/२०१८ रोजी देण्यात आला आहे. शासन परिपत्रक दिनांक ३०/०७/२०१० व शासन शुध्दीपत्रक दिनांक २९/०६/२०११ मधील तरतूदी नुसार मुळ वहीवाटदार तायप्पा तुका तरसे यांच्या वारसांची नोंद वहीवाट सदरातून इतर हक्कामध्ये घेतली आहे.त्यानुसार सदर मिळकत वहीवाटदारांच्याच ताब्यात असून याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे उत्पन्नाची रक्कम वसूलीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालय, पनवेल येथील परिरक्षण भुमापक यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४४) १३१८३८ (३०-११-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपअधिक्षक भुमिअभिलेख कार्यालय, पनवेल येथील परिरक्षण भुमापक यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी, शिस्तभंग आणि इतरत्र बदली करण्याचा प्रस्ताव उपसंचालक, भुमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिंनाक १९ जून, २०१७ रोजी जमाबंदी आयुक्त, भुमि अभिलेख, पुणे यांच्याकडे पाठविला असून सदर प्रस्तावावर तातडीने कार्यवाही होण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिंनाक १८ जुलै, २०१८ रोजी मा.मंत्री, महसूल यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रस्तावावर अद्यापि कोणतीही कार्यवाही झाली नसून उपसंचालक, भुमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिशाभूल करणारी माहिती देवून संबंधितांची पाठराखण करण्यात येत असल्याचे तसेच उक्त परिरक्षण भूमापक यांच्याविरुद्ध नागरिकांसह लोकप्रतिनिधीनी तक्रारी केल्यांनतरही तसेच विभागीय चौकशी व शिस्तभंगाची कार्यवाही सुरू असतांनाही त्यांची नियुक्ती पनवेल भूमी अभिलेख कार्यालयात महत्वाच्या पदावर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार सदर प्रस्तावाच्या आधारे सखोल चौकशी करून सर्व दोषींवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०३-२०१९) :** (१) मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, महसूल यांना दिनांक १८.०७.२०१८ रोजी निवेदन दिले असून सदर निवेदन शासनाच्या दि. ०३.०८.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे पुढील कार्यवाहीस्तव जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आले आहे.

(२) जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दिनांक ३१.०५.२०१८ रोजीच्या आदेशान्वये श्री.विजय खैरनार, परिरक्षण भूमापक, उप अधिक्षक भूमि अभिलेख, कार्यालय पनवेल यांची अंतर्गत बदली निमतानदार क्र.२, उप अधिक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय पनवेल या पदावर करण्यात आलेली आहे. उप अधिक्षक भूमि अभिलेख, पनवेल यांनी नियमानुसार चौकशी करुन श्री.खैरनार यांच्याविरुध्द असणाऱ्या दोषारोपांबाबत "ठपका" ठेवण्याचा शिक्षा आदेश पारित केलेला आहे.

(३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) सदर प्रस्तावातील सर्व १८ कर्मचाऱ्यांचे बाबतीत या विभागाच्या अधिनस्त कार्यालयांकडून चौकशी करुन शिक्षा आदेश पारित केलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) तालुक्यातील जमिनीची अवैधरित्या खरेदी करुन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४५) १३२३५८ (३०-११-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सावळी (ता.मिरज, जि.सांगली) येथील गट नं.१७१/१ मध्ये १९ आर (गुंठे) या अलका गोरखनाथ गोरे यांच्या मालकी हक्काच्या जमिनीत श्री.शिवराज इंडस्ट्रीज तर्फे सुरेश निल्लापा बिराजदार तसेच सतीश दत्तात्रय कदम यांनी भागीदारीत उद्योग करण्यासाठी करारनामा करावयाचा आहे असे जमीन मालक अलका मोरे यांना सांगून जमिनीचे खरेदीखत दस्त करुन मंडळ अधिकारी व तलाठी (मौजे सावळी) यांच्या संगनमताने श्री.शिवराज इंडस्ट्रीज तर्फे भागीदार सुरेश निल्लापा बिराजदार तसेच सतीश दत्तात्रय कदम यांच्या नावे दाखल केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी हडप केलेली जमीन परत मुळ मालकास देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व अलका मोर यांनी मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, सांगली, उपविभागीय अधिकारी, मिरज सह दुय्यम निबंधक, सांगली व तहसिलदार, सांगली, यांच्याकडे लेखी तक्रार केली असूनही याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने श्री. शिवराज इंडस्ट्रीज तर्फे भागीदार सुरेश निल्लापा बिराजदार तसेच सतीश दत्तात्रय कदम यांनी शासकीय अधिकारी यांच्या संगणमताने बनावट कागदपत्रांच्या आधारे सदर मिळकतीवर नोंदविलेले नाव काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०३-२०१९) :** (१), (२), (३) व (४) मौजे सावळी ता.मिरज, जि.सांगली येथील गट नं. १७१/१ मधील १९ आर जमिनीचे रजिस्टर खरेदी दस्त दि. २७/०३/२०१८ रोजी तलाठी सावळी यांना प्राप्त झाले होते. त्यानुसार दि. २५/०४/२०१८ रोजी फेरफार क्र. १००३५ अन्वये नोंद करणेत आली होती. तथापि ऑनलाईन गा.न.नं. ७/१२ सदरी क्षेत्राचा मेळ बसत नसल्याने नोंद नामंजूर करण्यात आली. त्यांनतर क्षेत्राचा मेळ घेवून फेरफार क्र. १०१४२ दि. २८/०७/२०१८ रोजी घेण्यात आला. त्याबाबतची नोटीस दि. २८/०७/२०१८ रोजी बजविण्यात आली. सदर नोटीसीबाबत कोणतीही हरकत /तक्रार प्राप्त न झाल्याने मुदतीनंतर दि. १४/०८/२०१८ रोजी संबंधित मंडळ अधिकारी यांनी नोंद मंजूर केली आहे. सदर फेरनोंद करणेपुर्वी पुनर्विलोकनाचा प्रस्ताव सादर न केलेने फेरफार क्र.१०१४२ पुनर्विलोकनामध्ये घेणेसाठीचा प्रस्ताव तहसिलदार, मिरज यांनी उपविभागीय अधिकारी, मिरज यांचे कार्यालयाकडे सादर केला होता. त्यानुसार तहसिलदार, मिरज यांना फेरफार क्र. १०१४२ पुनर्विलोकनात घेवून सुनावणीअंती नियमानुसार योग्य ते आदेश पारित करणेबात उपविभागीय अधिकारी मिरज यांचे दि. ०२/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुषंगाने तहसिलदार, मिरज यांचे स्तरावर सदरची नोंद पुनर्विलोकनात घेवुन नियमानुसार सदर नोंदीबाबत गुणवत्तेवर

योग्य ती कार्यवाही करणेची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी तक्रारदारांनी केलेली तक्रार ही खरेदी दस्ताच्या सत्यतेबाबत आहे. सदर तक्रार तहसिलदार, मिरज यांच्या कार्यालयाकडून दि. २४/१०/२०१८ रोजी चौकशीसाठी मंडळ अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत खरेदी दस्ताच्या सत्यतेबाबत मिरज येथील दिवाणी न्यायालयामध्ये रेग्युलर दिवाणी मु. नं. २४०/२०१८ सुरु असून प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झरी (ता.जि.परभणी) येथील शासकीय जमीन अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी देण्याबाबत**

**(४६) १३२६६० (३०-११-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झरी (ता.जि.परभणी) येथील गट नं.३५ मधील १ हेक्टर ८० आर शासकीय जमीन अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी देण्याबाबत मागणी कृषीभूषन कांतराव देशमुख व ग्रामस्थ यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे निवेदनाव्दारे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१९) :** (१) सरपंच व ग्राम विकास अधिकारी, झरी यांनी दिनांक ६.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मौजे झरी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी १२,००० चौ.फूट जागा व इतर शासकीय योजनाकरीता मौजे झरी, ता.जि. परभणी येथील गट नं.३५ मधील १ हेक्टर ८० आर जागा ग्रामपंचायतीकडे हस्तांतर करण्याची विनंती जिल्हाधिकारी, परभणी यांना केली आहे.
(२) मौजे झरी येथील गट नं. ३५, क्षेत्र १.८१ हेक्टर या गायरान जमिनीवर काही प्रमाणात अतिक्रमण असून त्याबाबत उपअधीक्षक, भुमि अभिलेख यांचेकडून मोजणी अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त होताच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी आवश्यक असणारी जमीन अतिक्रमण विरहीत व वाटपास निर्विवाद उपलब्ध होत असल्यास जमीन प्रदानाबाबत कार्यवाही करणे शक्य होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील महसुल विभागातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(४७) १३२९४० (३०-११-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्याच्या महसूल विभागामध्ये उपजिल्हाधिकारी संवर्गातील ५ पदे व तहसीलदार संवर्गातील ५ पदे रिक्त असून राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यामधे सुद्धा महसूल विभागातील १० तलाठी व ७ लिपिक व ५ शिपायांची पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे तसेच शासनाच्या विविध योजना राबविण्यास व महसूल विभागातील अन्य प्रशासकीय कामास विलंब होत असल्याने सदरची पदे तातडीने भरणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार रत्नागिरी जिल्ह्यातील महसुल विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) रत्नागिरी जिल्ह्यात गट-अ मधील उपजिल्हाधिकारी संवर्गातील-३, तसेच गट-ब मधील नायब तहसिलदार संवर्गातील-१० आणि गट-क मधील १८६ व गट-ड मधील ३४ अशी रिक्त पदे आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी व तहसिलदार संवर्गातील पदे भरण्याबाबत मा.राज्यमंत्री, गृह निर्माण व उच्च तंत्र शिक्षण तथा पालक मंत्री रत्नागिरी यांचे, रिक्त पदे भरण्याबाबत पत्र प्राप्त झाले आहे.

तहसीलदार संवर्गातील रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व रिक्त पदे माहे डिसेंबर, २०१८ अखेर भरण्यात आली आहेत.

उक्त रिक्त पदांचा कार्यभार अतिरिक्त स्वरुपात इतर अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. त्यामुळे शासकीय योजनांवर कोणताही विपरित परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे.

पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने व सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सरळसेवेने भरण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील भूमी अभिलेख कार्यालयामध्ये भूमापन परताव्याची असंख्य प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(४८) १३३२४८ (३०-११-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भूमी अभिलेख कार्यालयामध्ये भूमापन परताव्याची असंख्य प्रकरणे मागील ४ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमी अभिलेख कार्यालय देवगड (जि.सिंधुदूर्ग) येथे भूमापन परताव्यासाठी मागील ४ वर्षापासून भूधारकानी भूमापन कार्यालयात निवेदन व स्मरणपत्र देऊनही अद्यापही प्रकरणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार देवगड भूमी अभिलेख कार्यालयातील व संपूर्ण राज्यातील भूमापन परताव्याची प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१९) :** (१) पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद अमरावती व नागपूर या विभागातील अनुक्रमे ११, ९, १२, ३, ७ व २ अशी एकूण ४४ मोजणी फी परताव्याची प्रकरणे शिल्लक आहेत.
(२) मौजे किंजवडे, ता.देवगड, जि.सिंधुदूर्ग येथिल ९ प्रकरणामध्ये श्री.सखाराम साबाजी मयेकर यांनी मोजणी फी परतावा मिळण्यासाठी उप अधीक्षक, भूमि अभिलेख, देवगड, सिंधुदूर्ग यांचेकडे दिनांक ३१.०८.२०१६ रोजी अर्ज केला होता. त्यानुसार उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक २२.०५.२०१८ रोजी सदर ९ प्रकरणामध्ये मोजणी फी परतावा बाबत आदेश पारित केला आहे.
(३), (४) व (५) मौजे किंजवडे, ता.देवगड, जि.सिंधुदूर्ग येथिल मोजणी फी परतावा प्रकरणामध्ये उप अधीक्षक, भूमि अभिलेख, देवगड, सिंधुदूर्ग यांचेकडून विलंब झालेला आहे, याबाबत तत्कालीन उप अधीक्षक, भूमि अभिलेख, देवगड, सिंधुदूर्ग यांना जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सिंधुदूर्ग यांच्याकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. उप अधीक्षक, भूमि अभिलेख, देवगड, सिंधुदूर्ग यांचेकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर मोजणी फी परतावा बाबतची प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार नियमांतर्गत कारवाई करण्याच्या सूचना उप संचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई याना दिल्या आहेत.

तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १५.०६.१९९५ च्या शासन निर्णयानुसार ठरविण्यात आलेल्या मोजणी फी परताव्याचे वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करून ते सुलभ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## धुळे जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांसाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याबाबत

**(४९) १३३४७९ (३०-११-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील अनेक गावांमध्ये शासकीय जमीन नसल्यामुळे अनेक शासकीय कार्यालये खाजगी मालकीच्या जमिनीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करून धुळे जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांसाठी सरकारी जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१९) :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) विविध शासकीय कार्यालयांनी वेळोवेळी मागणी केल्यानुसार उपलब्ध असलेल्या जमिनी/जागा संबंधित शासकीय कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात येतात. तथापि, धुळे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणापासून दूर अंतरावर स्थित असलेल्या शासकीय कार्यालयांकडून शहरात मध्यवर्ती जागा मिळण्याबाबतचे काही प्रस्ताव जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रस्ताव संबंधित तहसिलदार व इतर विभागांकडे चौकशीसाठी पाठविण्यात आले असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित कार्यालयांना नियमानुसार जागा मंजूरीबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी, धुळे यांच्या स्तरावरुन करण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५०) १३४१५९ (३०-११-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तहसिल कार्यालयात ५ नायब तहसिलदारांची पदे मंजूर असूनही ३ नायब तहसिलदारांची पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त पदांमुळे नागरीकांची कामे विहित मुदतीत पूर्ण होत नसल्याने त्यांची गैरसोय होत असून तहसिल कार्यालयात कार्यरत दोन नायब तहसिलदारांवर रिक्त पदांमुळे कामाचा अतिरिक्त ताण येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन वसई तहसीलदार कार्यालयातील नायब तहसिलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०३-२०१९) :** (१) तहसिल कार्यालय वसई, जि.पालघर येथे नायब तहसिलदार संवर्गाची ५ मंजूर पदांपैकी नायब तहसिलदार (संजय गांधी योजना) हे १ पद व्यपगत झाले असल्यामुळे ते भरता येत नाही. उर्वरीत ४ पदांपैकी २ पदे भरलेली आहेत.
(२), (३) व (४) तहसिल कार्यालय वसई, जि.पालघर येथील व्यपगत झालेले नायब तहसिलदार (संजय गांधी योजना) हे पद पुनर्जिवीत करणेबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास विनंती करण्यात आली आहे. राज्यातील विविध महसूल विभागातील नायब तहसिलदार संवर्गाच्या सरळसेवा कोटयातील रिक्त पदांच्या अनुषंगाने एकत्रित मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहे. तसेच नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देऊन पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, कोकण यांचेस्तरावरून करण्यात येत आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.